# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com


वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 02.05.2020.
5. विभाग नियंत्रक रा. प. उस्मानाबाद विभाग यांचे पत्र जा.क्र./राप/विनिउ/विकाशा/यंत्र/20/555 दि. 06.05.2020.
6. महाव्यवस्थापक, म.रा.मा.प. महामंडळ, यंत्र अभियांत्रिकी खाते, मुंबई यांचे पत्र क्र. राप/यंअ/देखभाल/979 दि. 04.05.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांक:- 07 /05/2020.

**विषय:- उस्मानाबाद जिल्हांतर्गत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय कार्यशाळा व आगार कार्यशाळा येथील कामकाज सुरु करण्यासाठी परवानगी देणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने “महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020” प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यात लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 17 मे 2020 पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. यातील मुद्दा क्र. 9 (iii) नुसार ग्रीन झोन मध्ये बस डेपो 50 टक्के इतक्या क्षमतेने सुरु करणेस परवानगी देण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 5 अन्वये विभाग नियंत्रक रा. प. उस्मानाबाद यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ उस्मानाबाद, विभागातील विभागीय कार्यशाळा व आगार कार्यशाळा येथील कामकाज सकाळी 8.30 ते 17.30 या वेळेमध्ये सुरु करण्यासाठी परवानगी मिळणे बाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये मला प्राप्त अधिकारांनुसार करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता लॉकडाऊनच्या कालावधीत दि. 17 मे 2020 पर्यंत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ उस्मानाबाद, विभागातील विभागीय कार्यशाळा व आगार कार्यशाळा येथील कामकाज सकाळी 8.30 ते 17.30 या वेळेमध्ये सुरु करण्यासाठी खालील अटी व शर्तीच्या आधारे परवानगी देत आहे.



Scanned by CamScanner

1. संदर्भ क्र. 4 च्या महाराष्ट्र शासनाचे आदेशातील मुद्दा क्र. 9 (iii) नुसार विभागीय कार्यशाळा व आगार कार्यशाळा 50 टक्के क्षमतेने सुरु करता येतील.
2. कोव्हीड 19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्य विभागाने तयार केलेली प्रमाणित कार्यपद्धती (SOP) चे पालन करणे बंधनकारक राहील.
3. कर्मचा-यांची बायोमेट्रीक उपस्थिती न नोंदविता हजेरीपटावर उपस्थिती घेण्यात यावी.
4. विभागीय कार्यशाळा व आगार कार्यशाळा येथे वारंवार स्वच्छता व निर्जंतूकीकरण करण्यात यावे तसेच आरोग्य विभागाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार सामाजिक अंतराचे पालन करण्यात यावे.
5. उपस्थित कर्मचा-यांनी वैयक्तिक स्वच्छता राखणे, मास्क, ग्लोव्हज, गॉगल्स, सॅनिटायझर यांचा वापर करणे बंधनकारक असेल. कर्मचा-यांना त्यांचे हाताने त्यांचे नाक, तोंड व डोळ्यांवर स्पर्श न करणेबाबत सूचित करावे.
6. शासनाकडून तसेच आरोग्य विभागाकडून वेळोवेळी देण्यात येणा-या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच संदर्भ क्र. 6 चे पत्रान्वये महाव्यवस्थापक, म.रा.मा.प. महामंडळ, यंत्र अभियांत्रिकी खाते, मुंबई यांनी दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांका पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(दिप्रा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रति,**

**विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
4. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
5. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
6. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
8. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

7/5/20
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner